# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र. २३/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१७

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,

विषय :- बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये मतदान प्रतिनिधी नियुक्त करणेबाबत..

महोदय,

बहुसदस्यिय प्रभाग पध्दतीमध्ये प्रभागामधून सरासरी ४ उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत. त्यामुळे प्रभागामध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या जास्त राहील. पयार्याने मतदान केंद्रावरील मतदान प्रतिनिधींच्या संख्येतही वाढ होईल. मान्यताप्राप्त राजकीय पक्ष तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले इतर राजकीय पक्ष यांनी प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांवर उमेदवार उभे केले असल्यास त्यांच्यावतीने एकाच मतदान प्रतिनिधीची नेमणूक केल्यास मतदान केंद्रावरील गर्दी कमी होऊ शकते. या अनुषंगाने काही महानगरपालिकांनी मार्गदर्शन मागितले आहे.

२. वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन मतदान प्रतिनिधी नेमताना प्रभागातील एका पक्षाच्या उमेदवारांच्यावतीने शक्यतो एका मतदान केंद्रावर एकच मतदान प्रतिनिधी नियुक्त करावा असे आवाहन उमेदवारांना करण्यात यावे. पक्षाच्या उमेदवारांनी एकापेक्षा जास्त प्रतिनिधी नियुक्त करण्याचा आग्रह धरल्यास एकावेळी त्या पक्षांच्या उमेदवारांचा एक प्रतिनिधी मतदान केंद्रात थांबेल व इतर प्रतिनिधी आळीपाळीने मतदान केंद्रामध्ये उपस्थित राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र